महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN: 40109MH2005SGC153645

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
कार्यालय - अधीक्षक अभियंता (स्था.), स्थापत्य मंडळ,
दुसरा मजला, क्रांती चौक फयुज कॉल सेंटर ईमारत, शासकीय
दुध डेअरी जवळ, जालना रोड, छ. संभाजीनगर-४३१००१.
भ्रमणध्वनी क्र. ७८७५०१११७०
ई-मेल:- secaurangabad@mahadiscom.in,
secaurangabad@gmail.com

**अ. अ. (स्था) / मंडळ कार्यालय /स्थापत्य/ छ.संभाजीनगर/ तां /** No - 0856 दि. 3 SEP 2024

## -: सूचना :-

महावितरण, स्थापत्य मंडळ कार्यालय, छ. संभाजीनगर अंतर्गत जिल्हा नांदेड आणि परभणी येथील महावितरण अंतर्गत नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंत्यांना कामे वाटप करण्याची सोडत दि. १०.०९.२०२४ रोजी अधीक्षक अभियंता (स्थापत्य), स्थापत्य मंडळ, छ. संभाजीनगर यांचे कार्यालयात नियोजित करण्यात आली आहे. वरील जिल्ह्यातील महावितरण मध्ये नोंदणी केलेल्या सर्व बेरोजगार स्थापत्य अभियंत्यांना अद्ययावत पासबुक, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, आणि ओळखपत्र इत्यादीसह मंडळ कार्यालयात व्यक्तीशः उपस्थित राहण्यासाठी सूचित करण्यात येत आहे. सोडतीसाठी प्रतिनिधीची उपस्थिती ग्राह्य धरण्यात येणार नाही. **तसेच, दि. ०३.०९.२०२४ पर्यंत ज्यांना प्रमाणपत्र मिळाले आहे अश्याच "सुबे" नां या सोडतीमध्ये सहभागी होता येईल.**

| क्र. | तपशील/जिल्हा | नांदेड | परभणी |
|---|---|---|---|
| १ | या कार्यालयात नियोजित सोडतीसाठी नाव नोंदविण्याची तारीख व वेळ.<br>**(१२:०० वाजेनंतर नाव नोंदविले जाणार नाही तसेच नाव नोंदणी करतांना नोंदणी प्रमाणपत्र,ओळखपत्र,पासबुक इत्यादींची झेरोक्स प्रत जमा करणे आवश्यक आहे, करिता प्रत सोबत आणणे.)** | तारीख<br>दि. १०.०९.२०२४<br>वेळ :<br>११:०० ते १२:०० | तारीख<br>दि. १०.०९.२०२४<br>वेळ :<br>११:०० ते १२:०० |
| २ | नोंदविलेल्या "सुबें" अभियंत्यांच्या दस्त ऐवजांची (नोंदणी प्रमाणपत्र,ओळखपत्र,पासबुक,इत्यादी.) आणि केलेल्या कामांची पडताळणी करणे आणि पात्र उमेदवारांची यादी अंतिम करणे. | ११:०० ते १२:३० | ११:०० ते १२:३० |
| ३ | सोडतीसाठी वेळ | १२:३० | १२:४५ |

**टीप :-**

१. सर्व स्थापत्य सुबे अभियंता यांनी सोडतीसाठी नाव नोंदणी करण्यासाठी विहित वेळेतच कार्यालयात पोहचावे. याबाबत कुठलीही सबब ऐकली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
२. पासबुक अद्ययावत असणे बंधनकारक असून त्यावर उपव्यवस्थापक (वि. व ले.) तसेच का. अ. (स्था.) यांचे सही आणि शिक्का असणे आवश्यक आहे. त्या शिवाय सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना सोडती मध्ये सहभाग घेता येणार नाही.
३. सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांनी सोडतीसाठी शासनमान्य ओळखपत्र, रजिस्ट्रेशन ची मूळ प्रत तसेच कार्यालयीन कामासाठी झेरोक्स प्रत आणणे बंधनकारक आहे. अन्यथा सोडतीमध्ये अपात्र ठरविले जाईल.
४. सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांचा महावितरणचा SAP Vendor code आवश्यक आहे.
५. सदरची सर्व स्थापत्य कामे तातडीची असल्याने सुबे यांनी सुरक्षा रक्कम ( DD/Online/ Bank Guarantee) जमा करावी आणि तातडीने कामाची सुरुवात करावी.
६. सदरची कामे अत्यंत तातडीची असल्याने दिलेल्या वेळेत/मुदतीत पूर्ण करणे आवश्यक आहे.अन्यथा कंपनीच्या नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**नियोजित कामे :-** परिशिष्ट 'अ' नुसार.     कार्यालयीन पत्ता खालीलप्रमाणे आहे.

अधिक्षक अभियंता (स्था), स्थापत्य मंडळ,
क्रांती चौक, दुसरा मजला, फ्युज कॉल सेंटर इमारत,
महावितरण शासकीय दुध डेअरी जवळ, जालना रोड, छ. संभाजीनगर - ४३१००१.

## परिशिष्ट 'अ'

| Sr. No. | Name of Work | Estimated Amount ( GST Incl.) |
|---|---|---|
| | **District : Nanded** | |
| 1 | Control room maintenance & yard safety works at 33/11 KV s/stn Betmogra Tq. Mukhed Dist. Nanded. (Time limit:- 60 Days) | 9,98,021/- |
| | **District : Parbhani** | |
| 1 | Various civil maintenance works at 33/11 KV s/stn Khadaka Tq. Sonpeth Dist. Parbhani. (Time limit:- 60 Days) | 9,71,321/- |
| 2 | Various civil maintenance works at 33/11 KV s/stn Renapur Tq. Pathri Dist. Parbhani. (Time limit:- 60 Days) | 9,76,145/- |
| 3 | Various civil maintenance works at 33/11 KV s/stn Dhengali Pimpalgaon Tq. Selu Dist. Parbhani. (Time limit:- 60 Days) | 9,75,799/- |
| 4 | Construction of transformer plinth at 33/11 KV s/stn Pedgaon Tq. & Dist. Parbhani. (Time limit:- 30 Days) | 2,59,668/- |
| 5 | Various civil maintenance works at 33/11 KV s/stn Malegaon Donwada Tq. Jintur Dist. Parbhani. (Time limit:- 60 Days) | 9,97,204/- |
| 6 | Various civil maintenance works at 33/11 KV s/stn Selu Raigadh Corner Tq. Selu Dist. Parbhani. (Time limit:- 60 Days) | 9,40,724/- |
| 7 | Various civil maintenance works at 33/11 KV s/stn Hadgaon Pawade Tq. Selu Dist. Parbhani. (Time limit:- 60 Days) | 9,66,061/- |

——————— xxx ——————— xxx ———————

**Superintending Engineer (Civil),**
**Civil Circle, Chhatrapati Sambhajinagar.**